# 11 सप्टेंबर 2021 चालू घडामोडी PDF Download

**Daily Current Affairs in Marathi:** Current Affairs (चालू घडामोडी) हा सर्वात महत्वाचा विषय आहे आणि जर आपण आपला वेळ मनापासून समर्पित केला तर आपण या विषयातून खूप चांगले गुण मिळवू शकतो. Current Affairs (चालू घडामोडी) च्या संबधीत MPSC State Service, MPSC Group B, MPSC Group C, Saral Seva Bharati, Talathi, Police Constable, RRB, अशा अनेक स्पर्धापरीक्षांमध्ये बरेच प्रश्न विचारले जातात. हा विषय असा आहे ज्या बदल माहिती असेल तरच आपल्याला परीक्षेत उत्तरे देता येतात तेदेखील खूप कमी वेळात आणि तो वेळ आपल्याला दुसऱ्या प्रश्नांना वापरता येतो. म्हणून या विषयात चांगले गूण मिळवण्यासाठी आपल्याला देशात आणि जगात काय चालले आहे याची माहिती असणे खूप गरजेचे आहे.

## Daily Current Affairs In Marathi दैनिक चालू घडामोडी: 11 सप्टेंबर 2021

येथे आम्ही Daily Current Affairs in Marathi मध्ये सर्व वर्तमानपत्रांमधून समकालीन घटनांचा सारांश आपल्यासमोर सादर करतो, ज्यामुळे आपला वेळ वाचतो आणि आपले ज्ञान वाढते. तर चला आपण आता चालू घडामोडी (Daily Current Affairs) 2021 | 11-September-2021 पाहुयात.

## आंतरराष्ट्रीय बातम्या (Current Affairs for Competitive Exams)

**1. एल साल्वाडोर राष्ट्रीय चलन म्हणून बिटकॉईन स्वीकारणारा पहिला देश बनला**

- **एल साल्वाडोर बिटकॉईनला** कायदेशीर चलन म्हणून स्वीकारणारा जगातील **पहिला** देश बनला आहे.
- एल साल्वाडोर सरकारने दावा केला आहे की, या निर्णयामुळे देशातील अनेक नागरिकांना पहिल्यांदाच बँक सेवांमध्ये प्रवेश मिळेल.

**सर्व स्पर्धा परीक्षांकरिता उपयुक्त माहिती:**

- अल साल्वाडोर राजधानी: सॅन साल्वाडोर
- अल साल्वाडोरचे अध्यक्ष: नायब बुकेले.

## अर्थव्यवस्था बातम्या (Daily Current Affairs for MPSC)

**2. एनपीसीआय आणि फीसर्व्हे यांनी nFiNi' कार्यक्रम सुरू केला**



- **नॅशनल पेमेंट्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया** (NPCI) ने **Fiserv Inc**. सह भागीदारी करून प्लग-अँड-प्ले RuPay क्रेडिट कार्ड स्टॅक, **'nFiNi'** सुरु केले.
- nFiNi फिनटेक आणि बँकांना RuPay क्रेडिट कार्ड जारी करण्यासाठी आवश्यक असलेल्या सेवांचा एक तयार स्टॅक आहे आणि फिनटेक बँक-प्रायोजित क्रेडिट कार्ड सह-तयार करण्यास सक्षम करेल. हा एक **BaaS (बँकिंग-ए-ए-सर्व्हिस)** प्रोग्राम आहे.

**सर्व स्पर्धा परीक्षांकरिता उपयुक्त माहिती:**

- नॅशनल पेमेंट्स कॉर्पोरेशन ऑफ इंडियाचे एमडी आणि सीईओ: दिलीप आसबे.
- *नॅशनल पेमेंट्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया मुख्यालय: मुंबई.
- नॅशनल पेमेंट्स कॉर्पोरेशन ऑफ इंडियाची स्थापना: 2008

# बैठक आणि परिषदा बातम्या (Daily Current Affairs for MPSC)

### 3. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 13 व्या ब्रिक्स शिखर परिषदेचे अध्यक्षपद भूषवले

- भारताचे पंतप्रधान **नरेंद्र मोदी** यांनी व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे **13 व्या ब्रिक्स** शिखर परिषदेचे अध्यक्षपद भूषवले आहे.
- भारताच्या नेतृत्वाखालील शिखर परिषदेची संकल्पना **"ब्रिक्स@15: सातत्य, एकत्रीकरण आणि सहमतीसाठी आंतर-ब्रिक्स सहकार्य."** भारताने निवडलेली संकल्पना 2021 मध्ये साजरा होणाऱ्या ब्रिक्सच्या पंधराव्या वर्धापन दिनाला प्रतिबिंबित करते.

- पीएम मोदींनी **‘बिल्ड-बॅक रिझिलिएंटली, इनोव्हेटिव्हली, क्रेडिबली अँड सस्टेनेबली’** या ब्रीदवाक्याखाली ब्रिक्स सहकार्य वाढवण्याचे आवाहन केले.
- **‘नवी दिल्ली घोषणापत्र’** स्वीकारून शिखर परिषदेचा समारोप झाला. भारताने ब्रिक्स शिखर परिषदेचे आयोजन तिसऱ्यांदा केले.
- यापूर्वी भारताने **2012** आणि **2016** मध्ये ब्रिक्सचे अध्यक्षपद भूषवले होते.भारताने या वर्षीच्या ब्रिक्स शिखर परिषदेसाठी चार प्राधान्य क्षेत्रांवर प्रकाश टाकला आहे ते खालीलप्रमाणे;
- बहुपक्षीय व्यवस्थेत सुधारणा,
- दहशतवादविरोधी सहकार्य,
- शाश्वत विकास लक्ष्य (SDG) साध्य करण्यासाठी डिजिटल आणि तांत्रिक साधनांचा वापर करणे,
- लोकांमध्ये लोकांची देवाणघेवाण वाढवणे

# नियुक्ती आणि राजीनामा बातम्या (Daily Current Affairs for Maharashtra state exams)

### 4. एएसओएसएआय चे अध्यक्ष म्हणून भारताचे सीएजी गिरीश चंद्र मुर्मू यांची निवड

- **भारताचे नियंत्रक आणि महालेखापरीक्षक** (CAG), **गिरीश चंद्र मुर्मू** यांची **2024 ते 2027** या तीन वर्षांच्या कालावधीसाठी **एशियन ऑर्गनायझेशन ऑफ सुप्रीम ऑडिट इन्स्टिट्यूशन्स (ASOSAI)** च्या असेंब्लीच्या अध्यक्षपदी निवड झाली.
- 56 व्या कार्यकारी मंडळाद्वारे मुर्मू यांची निवड झाली. भारत 2024 मध्ये ASOSAI च्या **16 व्या** संमेलनाचे आयोजन करेल.

- ASOSAI हा **इंटरनॅशनल ऑर्गनायझेशन ऑफ सुप्रीम ऑडिट इन्स्टिट्युशन्स** (INTOSAI) प्रादेशिक गटांपैकी एक आहे ज्याचा उद्देश सार्वजनिक लेखापरीक्षण क्षेत्रात कल्पना आणि अनुभवांच्या देवाणघेवाणीद्वारे सदस्य संस्थांमध्ये समज आणि सहकार्य वाढवणे आहे.याची स्थापना **1979** ला झाली.

**5. विजय रुपानी यांनी गुजरातच्या मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा दिला**

- **विजय रुपानी** यांनी गुजरातच्या मुख्यमंत्रीपदाचा **राजीनामा** दिला आहे. त्यांनी आपला राजीनामा राज्यपाल **आचार्य देवव्रत** यांना सादर केला. गांधीनगरमध्ये झालेल्या बैठकीनंतर गुजरातमधील घडामोडींमुळे हा राजीनामा देण्यात आला आहे.

**6. इकबाल सिंह लालपुरा यांची राष्ट्रीय अल्पसंख्याक आयोगाच्या अध्यक्षपदी नियुक्ती**

- माजी आयपीएस अधिकारी **इकबाल सिंह लालपुरा** यांची राष्ट्रीय अल्पसंख्याक आयोगाच्या अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे.
- ते पंजाबचे असून त्यांनी शीख तत्त्वज्ञानावर अनेक पुस्तके लिहिली आहेत ज्यात **'जपजी साहिब एक विचार', गुरबानी एक विचार'** आणि **'राज करेगा खालसा'** यांचा समावेश आहे.
- त्यांनी राष्ट्रपती पोलीस पदक, गुणवंत सेवांसाठी पोलीस पदक, शिरोमणी शीख साहित्यकार पुरस्कार आणि शीख विद्वान पुरस्कार असे अनेक पुरस्कारही जिंकले आहेत.

**सर्व स्पर्धा परीक्षांकरिता उपयुक्त माहिती:**

- केंद्रीय अल्पसंख्याक व्यवहार मंत्री: मुख्तार अब्बास नक्वी

## महत्त्वाचे दिवस (Current Affairs for Competitive Exams)

**7. 09 सप्टेंबर: हिमालय दिवस 2021**

- राष्ट्रीय स्वच्छ गंगा मिशनने नौला फाउंडेशनच्या सहकार्याने **09 सप्टेंबर 2021** रोजी **हिमालय दिन** आयोजित केला होता.
- या वर्षीची संकल्पना **'हिमालयाचे योगदान आणि आपल्या जबाबदाऱ्या'** आहे. हा कार्यक्रम **'आझादी का अमृत महोत्सव'** या महोत्सवाचा भाग आहे.
- हिमालय दिवस दरवर्षी 9 सप्टेंबर रोजी **उत्तराखंड** राज्यात साजरा केला जातो. हिमालयीन परिसंस्था आणि प्रदेशाचे संवर्धन करण्याच्या उद्देशाने हा उत्सव साजरा केला जातो.
- **2015** मध्ये तत्कालीन मुख्यमंत्र्यांनी हा दिवस अधिकृतपणे हिमालय दिवस म्हणून घोषित केला होता.

**सर्व स्पर्धा परीक्षांकरिता उपयुक्त माहिती:**

- उत्तराखंडची स्थापना: 9 नोव्हेंबर 2000
- उत्तराखंडचे राज्यपाल: लेफ्टनंट जनरल गुरमित सिंह
- उत्तराखंडचे मुख्यमंत्री: पुष्कर सिंह धामी
- उत्तराखंडची राजधानी: देहरादून (हिवाळी), गेयरसैन (उन्हाळी)

## विज्ञान आणि तंत्रज्ञान बातम्या (Current Affairs for Competitive Exams)

**8. चीनने नवीन पृथ्वी निरीक्षण उपग्रह “गाओफेन -5 02” यशस्वीपणे प्रक्षेपित केला**

- चीनने उत्तर चीनच्या शांक्सी प्रांतातील तैयुआन उपग्रह प्रक्षेपण केंद्रातून **लॉन्ग मार्च -4 सी** रॉकेटच्या साहय्याने पृथ्वी निरीक्षण उपग्रह, **गाओफेन -5 02** अंतराळात प्रक्षेपित केला आहे.
- **गाओफेन-5 02** उपग्रह हा चीनच्या **गाओफेन** पृथ्वी-निरीक्षण उपग्रहांच्या मालिकेतील **24 वा** आहे, पर्यावरण संरक्षण प्रयत्नांवर नजर ठेवण्यासाठी आणि त्याच्या नैसर्गिक संसाधनांच्या देखरेखीला चालना देण्यासाठी याचा उपयोग होईल.

**सर्व स्पर्धा परीक्षांकरिता उपयुक्त माहिती:**

- चीनची राजधानी: बीजिंग
- चीनचे चलन: रेन्मिन्बी
- चीनचे अध्यक्ष: शी जिनपिंग.

**9. हवेतील कार्बन शोषून घेणारा जगातील सर्वात मोठा प्रकल्प आइसलँडमध्ये उभारण्यात आला**

- **कार्बन डाय ऑक्साईड** हवेतून शोषून घेण्यासाठी बनवलेल्या जगातील सर्वात मोठ्या प्रकल्पाचे **आइसलँडमध्ये** आपले काम सुरू केले आहे.
- या प्रकल्पाला **ओरका** असे नाव देण्यात आले आहे, ज्याचा अर्थ आइसलँडिक शब्दात ‘ऊर्जा’ असा होतो. हा प्रकल्प **प्रति वर्ष 4,000 टन $CO_2$** पर्यंत शोषून घेईल.
- हवेतून शोषून घेतलेला कार्बन डाय ऑक्साईड **1,000 मीटर** खोलीवर भूमिगत जमा केले जाईल. ही सुविधा

आइसलँडिक कार्बन स्टोरेज फर्म **कार्बफिक्सने** स्विस स्टार्ट-अप **क्लाइमवर्क्स एजीच्या** भागीदारीत विकसित केली आहे.

**सर्व स्पर्धा परीक्षांकरिता उपयुक्त माहिती:**

- आइसलँड राजधानी: रेकजाविक
- *आइसलँड चलन: आइसलँडिक क्रोना
- आइसलँड खंड: युरोप

## पुस्तके आणि लेखक बातम्या (Current Affairs for Competitive Exams)

### 10. उदय भाटिया लिखित "बुलेट्स ओव्हर बॉम्बे: सत्या अँड द हिंदी फिल्म गँगस्टर" पुस्तक प्रकाशित

- **उदय भाटिया** लिखित **"बुलेट्स ओव्हर बॉम्बे: सत्या अँड द हिंदी फिल्म गँगस्टर"** या नवीन पुस्तकाचे प्रकाशन झाले आहे.
- हे पुस्तक **राम गोपाल वर्मा, अनुराग कश्यप, मनोज बाजपेयी, विशाल भारद्वाज, सौरभ शुक्ला** यांच्या अनुभवांशी संबंधित आहे.

### 11. मनोहर लाल खट्टर यांच्या हस्ते 'हरियाणा इन्व्हीरॉनमेन्ट अँड पोल्यूशन कोड' या पुस्तकाचे प्रकाशन

- हरियाणाचे मुख्यमंत्री **मनोहर लाल खट्टर** यांनी माजी आयएएस अधिकारी आणि प्रसिद्ध कवयित्री **श्रीमती धीरा खंडेलवाल** यांनी संकलित केलेल्या **'हरियाणा इन्व्हीरॉनमेन्ट अँड पोल्यूशन कोड'** या पुस्तकाचे प्रकाशन केले.

## Importance of Daily Current Affairs in Marathi

**Importance of Daily Current Affairs in Marathi:** Daily current affairs in Marathi (दैनंदिन चालू घडामोडी) मुळे आपल्याला MPSC State Service, MPSC Group B, MPSC Group C, Saral Seva Bharati, Talathi, Police Constable, RRB, अशा अनेक स्पर्धापरीक्षांमध्ये विचारण्यात येणाऱ्या चालू घडामोडीवर आधारित प्रश्नांची तयारी करण्यास मदत होणार आहे तसेच Daily current affairs in Marathi (चालू घडामोडी) मुळे आपल्या सामान्य ज्ञानात वृद्धी होऊन परीक्षाभिमुख अभ्यास करण्यास सहाय्य होणार आहे.

## September 2021 chalu ghadamodi PDF Download

| Sr.No. | Name | Links | View PDF |
|---|---|---|---|
| 1 | 1 सप्टेंबर 2021 चालू घडामोडी | Download | Download PDF |
| 2 | 2 सप्टेंबर 2021 चालू घडामोडी | Download | Download PDF |
| 3 | 3 सप्टेंबर 2021 चालू घडामोडी | Download | Download PDF |
| 4 | 4 सप्टेंबर 2021 चालू घडामोडी | Download | Download PDF |
| 5 | 5 सप्टेंबर 2021 चालू घडामोडी | Download | Download PDF |
| 6 | 6 सप्टेंबर 2021 चालू घडामोडी | Download | Download PDF |
| 7 | 7 सप्टेंबर 2021 चालू घडामोडी | Download | Download PDF |

| Sr.No. | Name | Links | View PDF |
|---|---|---|---|
| 8 | 8 सप्टेंबर 2021 चालू घडामोडी | Download | Download PDF |
| 9 | 9 सप्टेंबर 2021 चालू घडामोडी | Download | Download PDF |
| 10 | 10 सप्टेंबर 2021 चालू घडामोडी | Download | Download PDF |

Officers Online Academy


आरोग्य विभाग भरती गट क व ड
फास्ट ट्रॅक रिव्हीजन बॅच
अंकगणित बुद्धीमत्ता
बॅच कालावधी : 15 ते 23 सप्टें 21
गणित व बुद्धिमत्ता प्रत्येक टॉपिक रिव्हिजन करून घेण्यात येईल
शॉर्ट ट्रिक्सने शिका व सर्व चॅपटर्स रिव्हिजन करा
हमखास यशासाठी
आजच जॉईन
करा
Punde Sir
Officers Online Academy
TEST, NOTES & E-BOOK FREE
8010457760
क्लास मिस झाल्यास परत कितीही वेळा पाहू शकता.